*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# भारतातील शेतकरी चळवळ

**डॉ. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे**

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे. मो.९८५०५४२४५५

.........................................................................................

**प्रस्तावना :**

भारतातील शेतकरी चळवळ फार प्राचीन आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात शेतकऱ्यांनी उठाव व चळवळी केल्या. १८५७ च्या उठावानंतर शेतकरी चळवळींच्या स्वरूपात बदल झाला. शेतकरी उघडपणे शेतीविषयक मागण्या सरकारकडे करू लागले. शेतकऱ्यांनी परदेशी मळेवाले, देशी जमीनदार, सावकार यांच्या विरूद्ध संघर्ष करण्यास सुरूवात केली. त्यातून बंगाल, बिहार, आसाम, महाराष्ट्र, गुजरातइत्यादी ठिकाणी शेतकरी चळवळी घडून आल्या. महात्मा फुले यांनी १८८३ साली शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. न्यायमूर्ती रानडे यांनी सार्वजनीक सभेद्वारे शेतीमध्ये भांडवली सुधारणा घडवून आणणे, आपत्तीप्रसंगी सरकारकडून शेतकऱ्यांना मदत देणे याबाबत भूमिका मांडली.२०व्या शतकात लोकमान्य टिळक, सरदार पटेल, महात्मा गांधी, वि. रा. शिंदे, शाहू महाराज इत्यांदीनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध आवाज उठविला. त्यामुळे शेतकऱ्यांवर होणारा अन्याय व अत्याचार थोडा कमी झाला. १९३६ साली प्रा. एज. जी. रंगा यांनी शेतकऱ्यांना संघटीत करून किसान सभेची स्थापना केली. किसान सभेच्या माध्यमातून चळवळीची रूपारेषा निश्चित होऊन आंदोलनांचा जोर वाढत गेला.१९४० साली आचार्य भिसे व बाळासाहेब खेर यांनी आदिवासी सेवा संघाच्या माध्यमातून आदिवसींच्या विकासाला चालना मिळाली. १९४६ साली श्री. शामराव परूळेकर आणि गोदावरी परूळेकर यांनी आदिवासींच्या शोषणाविरूद्ध आवाज उठविला. त्यांच्या नेतृत्वाखालीलआंदोलनाची सरकारला दखल घ्यावी लागली. स्वातंत्र्यानंतर कसेल त्याची जमीन या आधारावर झालेला कुळ कायदा हे या आंदोलनाचे फलीत आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ :**

१९४८ मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, उद्धवराव पाटील, शंकरराव मोरे इत्यादी नेत्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.या पक्षाने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र यशवंतराव चव्हाणांपुढे शेकापचे नेते प्रभावहीन ठरले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर शेकापचे प्रमुख नेते केशवराव जेधे, शंकरराव मोरे हे कॉंग्रेसमध्ये गेले. काळाच्या ओघात या पक्षाचा प्रभाव कमी होत गेला.स्वातंत्र्यानंतर सरकारी धोरणातून शेतीच्या विकासाला पूरक धोरण स्विकारले गेले नाही. पंचवार्षीक योजनांमधून औद्योगीक विकासाच्या तुलनेत शेती व्यवसायाला दुय्यम स्थान दिले. याच काळात विनोबा भावे यांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून जमीनदारांनांकडून मिळालेली जमीन भूमिहिनांना वाटली. त्यांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून केलेले कार्य भूमिहिन व शेतमजूर यांच्यासाठी मौलीक ठरले आहे.

१९६० च्या दशकात धान्य टंचाई निर्माण झाली. त्यामुळे सरकारने संकरीत बियाने, रासायनीक खते आणि जलसिंचनाच्या योजनांवर भर दिला. देशात हरीत क्रांती होउन धान्यांचे उत्पादन वाढले. त्यामुळे शेतकरी जातींचा विकास झाला. १९७० च्या दशकात दुष्काळामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. सरकार आपल्यासाठी विशेष काही करीत नाही, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली.त्यामुळे शेतकऱ्यांचा एक मोठा गट लढाऊ संघर्षासाठी पुढे आला. हरित क्रांतीमुळे शेतीचे हितसंबध तयार झाले होते. आणिबाणीचे धोरण आणि त्यानंतरचे राजकारण यामुळे राज्याराज्यातील शेतकरी जातींच्या राजकारणाला कलाटणी मिळू लागली.

**१९८० नंतरची शेतकरी चळवळ:** १९७२ च्या दुष्काळानंतर भारतीय शेतकऱ्यांची अवस्था दयणीय झाली होती. परिणामी शेतकऱ्यामध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात महेद्रसिंग टिकैत यांची भारतीय किसान युनियन, महाराष्ट्रात शरद जोशी यांचीशेतकरी संघटना, कर्नाटकात बसवराज तंबाखे यांची कर्नाटक रयत संघ इत्यादी संघटनांचा उदय झाला. १९८० नंतर भारतातील १४ राज्यांमध्ये उदयास आलेल्या शेतकरी संघटनांची राष्ट्रिय स्तरावर किसान समन्वय समिती स्थापन करण्यात आली. या समितीने भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न राष्ट्रिय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले. त्याचा प्रभाव धोरण निर्मिती आणि शासन व्यवहार यावर पडला.

महाराष्ट्रातशरद जोशी यांनी १९७८ साली शेतकरी संघटनेची स्थापना केली. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचा आणि शेतकरी चळवळीला वैचारीक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. शेतकरी संघटनेने शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भाव मिळावा, शेतीसाठी लागणारी वीज, पाणी, बी—बीयाने व खते यांच्या किमती नियंत्रीत असाव्यात व त्यावर अनुदान मिळावे, शेतकऱ्यांना अल्प दरात कर्ज मिळावे व नैसर्गीक आपत्तीच्या काळात सरकारने कर्ज माफ करावे, शेतीमालाच्या विक्रिसाठी क्षेत्रीय निर्बध नसावेत इत्यादी प्रमुख मागण्या केल्या. या मागण्यांच्या पुर्ततेसाठी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांचा स्वाभीमान जागृत केला. १९७८ ते १९८८ या दशकात शेतकरी संघटनेने कांदा, उस, कापूस, तंबाखू व दूध यांच्या भाववाढीसाठी आंदोलने केली. त्यामुळे एक प्रभावी शक्ती म्हणून शेतकरी संघटनेला मान्यता मिळाली. महाराष्ट्रात शरद जोशींच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनास सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने केलेली आंदोलने यशस्वी झाली. शेतकरी संघटनांनीसुरूवातीस अराजकीय भूमिका घेतली. राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यकत्यांना संघटनेच्या व्यासपीठावर मज्जाव केला.शेतकरी संघटनेच्या चळवळीचे राजकारण पक्षीय चौकटीबाहेर साकारले गेले. राजकीय पक्षांपासून दूर राहण्याच्या भूमिकेमुळे शेतकरी संघटनेला शेतकरी समूहांचा पाठींबा मिळाला. मात्र १९८४पासून शेतकरी संघटनेने सक्रीय राजकारणात सहभागी होण्याची भूमिका स्विकारली. संघटनेच्या वतीने लोकसभा व विधानसभेच्या निवडणूका लढविल्या, राजकीय पक्षंना निवडणूकीत पाठींबा दिला. मात्र संघटनेस निवडणूकीच्या आखाडयात अपेंक्षीत यश न मिळाल्याने संघटनेत नाराजी व मतभेद सुरू झाले. १९९१ साली भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारले. यामुळे भारतीय बाजारपेठा बहुराष्ट्रिय कंपण्यासाठी खुल्या झाल्या. या धोरणामुळे शेतकरी अडचणीत आला. शेतकरी संघटनेने खुल्याअर्थव्यवस्थेचे समर्थन केल्याने संघटनेत अंतर्विरोध वाढला. वैचारीक मतभेदामुळे अनिल गोटे, विजय जावंधिया, राजू शेट्टी, रघुनाथदादा पाटील हे प्रमुख नेते संघटनेतून बाहेर पडले. या नेत्यांनी आपापल्या परीने वेगवेगळया स्वरूपातील शेतकरी चळवळी उभ्या करण्याचा प्रयत्न केला. विजय जावंधीया व प्रकाश पोहरे यांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या जवळ न जाता विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविला. राजू शेट्टीयांनी स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून उस व दूधाच्या बाजार भावासाठी पश्चिम महाराष्ट्रात केलेली आंदोलने प्रभावी ठरली. सरकारने ऊस व दुधाला बाजारभाव वाढवून दिला. रधुनाथदादा पाटील यांनीही दुध व उसाला बाजारभाव मिळावा म्हणून केलेली आंदोलने लक्षणीय ठरली.

**शेतकरी चळवळीचे यश :** स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध समाज सुधारक व राजकीय नेत्यांनीकेलेल्या आंदोलनांमुळे भारतात शेतकरी चळवळीची पायाभरणी झाली. स्वातंत्र्यानंतर शेतकरी कामगार पक्ष व डाव्या पक्षांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम केले. १९८० च्या दशकात शरद जोशी, महेंद्रसिह टिकैत यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेनांनी केलेली आंदोलने प्रभावी ठरली. या आंदोलनांचा प्रभाव धोरण कर्त्यांवर पडला. शेतकरी हिताचे निर्णय घेणे सरकारला भाग पडले.

महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने कांदा, ऊस, कापूस, तंबाखू व दूध यांना रास्त भाव मिळवून देण्यासाठी केलेली आंदोलने यशस्वी ठरली.शेतकरी संघटनांनी पक्षविरहीत भूमिका घेतल्यानेशेतकरी वर्गाचा सक्रीय पाठीबा मिळाला. संघटनेची ताकद वाढली. तसेच शेतीमालाला रास्त भाव मिळाला.संघटनांच्या माध्यमातून समस्यांनी पिचलेला, विखुरलेला व व्यवस्थेचा बळी ठरलेला शेतकरी संघटीत झाला. संघटीतपणे दिलेल्या लढयातून आपल्यावरील अन्याय दुर होउ शकतो, असे आत्मभान शेतकरी वर्गात निर्माण झाले.

**शेतकरी चळवळीच्या मर्यादा:** शेतकरी संघटनांना राष्ट्रिय स्तरावर प्रभाव संघटन निर्माण झाले नाही. त्यामुळे त्यांचा राष्ट्रिय धोरण निर्मितीवर अपेक्षीत प्रभाव पडला नाही. तसेच त्यांना मिळालेला शेतकरी समूहांचा पाठींसा हा प्रादेशीक व व्यक्तिसापेक्ष राहिला. प्रत्येक राज्यातील शेतकऱ्या समस्य वेगवेगळया असल्याने संघटनांच्या वैचारीक भूमिकेस व्यापक सहमती मिळाली नाही. खुल्या आर्थिक धोरणानंतर शेतकऱ्यांमध्ये नव श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी असे दोन गट आहेत. हे गट आपले वैयक्तीक हित साधण्यास प्राधान्य देतात. तसेच खुल्या अर्थव्यवस्थेबाबत शरद जोशीसारख्या नेत्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे शेतकरी संघटनांमध्ये वैचारीक गोंधळ निर्माण झाला आहे. नेत्यांच्या सवत्या सुभ्यामुळे संघटनेची ताकद विभागली आहे. परिणामी शेतकरी आंदोलनांचा प्रभाव धोरणकर्त्यावर पडताना दिसत नाही.

**निष्कर्ष : १.** शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केलेल्या आंदोलनासशेतकरी वर्गाकडून पाठींबा मिळाला. तसेच संघटनेच्या नेतृत्वाला लोकमान्यता मिळाली. शेतकरी संघटनांच्या नेतृत्वाखालीलआंदोलनासआणि शेतीमालाला किफायशीर बाजारभाव मिळण्याच्या मागण्यास सरकारने सकारात्मक प्रतिसाददिला.

२. शेतकरी संघनांची बदलती वैचारीक भूमिका शेतकरी चळवळीस व शेतकरी हितास मारक ठरली आहे. त्याचा रचनात्मक आंदोलनांवर विपरीत परिणाम झाला. शेतकरी संघटनांनी निवडणूकीच्या राजकारणात भाग घेतल्याने त्यांचा जनाधार व प्रभाव कमी झाला.

३.शेतकरी संघटनेकडून कांदा, ऊस, कापूस, तंबाखू व दूध यांच्यासाठी आंदोलने झाली. मात्र कडधान्य व तेलबिया पिकविणाऱ्या जीरायत, गरीब व लहान शेतकरी आणि शेतमजूर यांच्यासाठी संघटनेने आंदोलने केली नाहीत.

४.सर्वशेतकरी संघटनांचे सुसूत्रिकरण होऊन राज्य व राष्ट्रीय स्तरावर शिखर समिती स्थापन झाली नाही. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सरकारवर अपेक्षीत दबाव निर्माण झाला नाही.

५. खुल्या अर्थव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेली नविन आव्हाणे विचारात घेउन संघटनेने आपल्या आंदोलनांना नवी दिशा दिली नाही. तसेच त्याबाबत व्यापक भूमिका घेणारे नेतृत्व शेतकरी चळवळीला मिळाले नाही.

**संदर्भसूची :**

१. मराठी विश्वकोश, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रथम आवृत्ती, वाई.
२. बोराडे प्रकाश, कोलाज : आर्थिक विकास आणि सामाजिक चळवळी, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००७.
३. शहा घनशाम, मराठी अनुवाद प्राची चिकटे, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.
४. साळुंके श्रीकांत, महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ, बी रघुनाथ प्रकाशन, परभणी, १९९६.
५. शेख गफुर, आधुनिक भारताचा इतिहास, प्रितम प्रकाशन, जळगाव, २००५.
**६.** सुर्यवंशी अंकुश, संपा., महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, नभ प्रकाशन, अमरावती, २०१६.
७. पळशीकर सुहास, राजकारणाचा ताळेबंद — भारतीय लोकशाहीची वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, २०१३.
८. कारेकर शोभा, शरद घोडके, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल प्रकाशन, नागपूर, २००४.
**९.** दै. सकाळ, संपादकीय, शेतकरी आंदोलनासाठी हवी नवी किल्ली, २ मे २०२०